राज्य आयोग व अधिनस्त परिक्रमा खंडपीठ व जिल्हा मंच या कार्यालयांचे संगणकीकरण व डिजिटायझेशन करण्यासाठी निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक : पुरक-२०१७/प्र.क्र.१९७/२०१७/ग्रा.सं.-४

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२
दिनांक: २३ मार्च, २०१८

वाचा :-

१) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका प्रकरणी (ज.या.क्र.१५६/२०११) मा.न्यायालयाचे दि.०५.०५.२०१७ चे आदेश.
२) रा.ग्रा.त.नि.आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.राआ/महा/लेखा/कक्ष-१३/५६५०, दि.३१.१०.२०१७
३) शासन निर्णय, समक्रमांक दि.१९.०३.२०१८

प्रस्तावना :-

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई व अधिनस्त परिक्रमा खंडपीठ औरंगाबाद/नागपूर तसेच, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, या कार्यालयांचे संगणकीकरण व डिजिटायझेशन करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबबात मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका प्रकरणी (ज.या.क्र.१५६/२०११) संदर्भ क्र.१ अन्वये आदेश दिले होते. त्यानुसार वरील कार्यालयांचे संगणकीकरण व डिजिटायझेशन करण्यासाठी रु.२,४९,४३,२३५/- इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा एकत्रित प्रस्ताव राज्य आयोगाने संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. सदर एकत्रित प्रस्तावांचे विभागीय अंमलबजावणी समितीसमोर (पी.आय.सी.) दि.०५.१०.२०१७ रोजी सादरीकरण करण्यात येऊन त्यास समितीने मान्यता प्रदान केली होती. सदर समितीच्या मान्यतेनंतर सामान्य प्रशासन विभागाने (माहिती तंत्रज्ञान कक्षाने) देखिल प्रस्तावास मान्यता प्रदान केली आहे. राज्य आयोगाने संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये सादर केलेल्या एकत्रित प्रस्तावाच्या अनुषंगाने रु.२,४९,४३,२३५/- इतका निधी विधी मंडळाच्या हिवाळी अधिवेशन-२०१७ मध्ये पुरक मागणीद्वारे मंजूर झाला आहे. यास्तव राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई व अधिनस्त परिक्रमा खंडपीठ औरंगाबाद/नागपूर तसेच, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, या कार्यालयांचे संगणकीकरण व डिजिटायझेशन करण्यासाठी रु.२,४९,४३,२३५/- (अक्षरी रु. दोन कोटी एकोणपन्नास लक्ष त्रेचाळीस हजार दोनशे पस्तीस फक्त) इतका निधी राज्य आयोगास संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आला होता. परंतु, वित्त विभागाने सन २०१७-१८ च्या सुधारीत अंदाजामध्ये रु.२,४९,४३,२३५/- इतक्या निधीच्या ९०% म्हणजेच रु.२,२४,४८,०००/- इतक्या निधीचे सुधारीत अनुदान विभागास

उपलब्ध करुन दिले आहे. त्यामुळे राज्य आयोगास संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला रु.२,४९,४३,२३५/- इतक्या निधीचा आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहे. यास्तव राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई व अधिनस्त परिक्रमा खंडपीठ औरंगाबाद/नागपूर तसेच, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, या कार्यालयांचे संगणकीकरण व डिजीटायझेशन करण्यासाठी रु.२,२४,४८,०००/- (९०%) (अक्षरी रु. दोन कोटी चोवीस लक्ष अठ्ठेचाळीस हजार फक्त) इतका सुधारीत निधी राज्य आयोगास वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

२. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई व अधिनस्त परिक्रमा खंडपीठ औरंगाबाद/नागपूर तसेच, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, या कार्यालयांचे संगणकीकरण व डिजिटायझेशन करण्यासाठी आवश्यक असणारी बाबनिहाय सामग्रीची खरेदी पुढीलप्रमाणे आहे :-

संगणकीकरण :-

अ क्र	सामग्रीचे नाव	सामग्रीची खरेदीची संख्या				प्रति नग रु.	एकूण नग	एकुण खर्च रु.
		राज्य आयोग	परिक्रमा खंडपीठ		जिल्हा मंच (४०)			
			नागपूर	औरंगाबाद				
१	लॅपटॉप	६	३	३	--	६७,४५६.८१/-	१२	८,०९,४८१.७२/-
२	संगणक	२०	८	८	१८६	४४,३०९.१५/-	२२२	९८,३६,६३१.३०
३	नेटवर्क स्वीचेस	४	२	२	८०	७,५००/-	८८	६,६०,०००/-
४	पोर्टेबल हार्ड डिस्क	२	१	१	४०	४,०००/-	४४	१,७६,०००/-
५	पेनड्राईव्ह	२१	६	६	१६०	३५०/-	१९३	६७,६२८/-
६	प्रिंटर	३	२	२	--	६,४८४.७१/-	७	४५,३९२.९७/-
७	प्रिंटर (एमएफडी)	४	१	१	४०	२०,९०५.५७/-	४६	९,६१,६५६.२२/-
८	स्कॅनर	१	२	२	--	२०,५००/-	५	१,०२,५००/-
९	यूपीएस	--	०	८	२२४	२,२४०.१३/-	२३२	५,१९,७१०.१६/-
	एकूण							रु.१,३१,७९,०००.३७/-

डिजिटायझेशन :-

राज्य आयोग व जिल्हा मंच	**ऑपरेटर**	**स्कॅनर**	**एकूण खर्च (ऑपरेटर+स्कॅनर)**
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग	ऑपरेटर-४ कालावधी-६ महिने ऑपरटरर्सचा कालावधी- २४ महिने प्रत्येकी मासिक वेतन-२०२५०/- **पदांचा एकूण खर्च-४,८६,०००/-**	संख्या-४ प्रत्येकी किंमत-८०,०००/- **एकूण किंमत-३,२०,०००/-**	**रु. ८,०६,०००/-**
परिक्रमा खंडपीठ, नागपूर	ऑपरेटर-१ कालावधी-६ महिने ऑपरटरर्सचा कालावधी- ६ महिने प्रत्येकी मासिक वेतन-२०२५०/- **पदांचा एकूण खर्च-१,२१,५००/-**	संख्या-१ प्रत्येकी किंमत-८०,०००/- **एकूण किंमत- ८०,०००/-**	**रु. २,०१,५००/-**
परिक्रमा खंडपीठ औरंगाबाद	ऑपरेटर-१ कालावधी-६ महिने ऑपरटरर्सचा कालावधी- ६ महिने प्रत्येकी मासिक वेतन-२०२५०/- **पदांचा एकूण खर्च-१,२१,५००/-**	संख्या-१ प्रत्येकी किंमत-८०,०००/- **एकूण किंमत- ८०,०००/-**	**रु. २,०१,५००/-**
जिल्हा मंच	ऑपरेटर-४० कालावधी-६ महिने ऑपरटरर्सचा कालावधी-२४० महिने प्रत्येकी मासिक वेतन-२०२५०/- **पदांचा एकूण खर्च-४८,६०,०००/-**	संख्या-४० प्रत्येकी किंमत-८०,०००/- **एकूण किंमत-३२,००,०००/-**	**रु. ८०,६०,०००/-**
		एकूण खर्च	**रु. ९२,६९,०००/-**

३. राज्य आयोग व अधिनस्त परिक्रमा खंडपीठ औरंगाबाद नागपूर तसेच, जिल्हामंच या कार्यालयांचे संगणकीकरण व डिजिटायझेशन करण्यासाठी रु.२,२४,४८०००/- (अक्षरी रु. दोन कोटी चोवीस लक्ष अठ्ठेचाळीस हजार फक्त) इतका निधी राज्य आयोगास वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर संगणकीकरण व डिजिटायझेशन यासाठी वरीलप्रमाणे करावयाची बाबनिहाय खरेदीची प्रक्रिया राज्य आयोगाने शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे अवलंबवून ती दि.३१.०३.२०१८ पर्यंत करण्याची दक्षता घ्यावी.

४. संगणकीकरण व डिजीटायझेशन यावरील खरेदीसाठी होणारा खर्च मागणी क्र.एम-२ लेखाशीर्ष २४०८-अन्न साठवण व वखार साठवण, ०१-अन्न, १०१-प्रापण व पुरवठा, (०४) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये राज्य परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंच स्थापन करणे, (०४) (०२) मुंबई शहर (दत्तमत)(२४०८०२५१), १७- संगणक खर्च रक्कम रु.२,२४,४८,०००/- (अक्षरी रु. दोन कोटी चोवीस लक्ष अठ्ठेचाळीस हजार फक्त) याखाली सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. उक्त शासननिर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक सदर्भ क्र.८०/१८ कोषा/प्रशा-५, दि.१२.०३.२०१८ च्या प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेताक क्रमांक २०१८०३२६१११९२६०८०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Raju Kalluji Narpande

Digitally signed by Raju Kalluji Narpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=F.C.S and C.P, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c9bb69da44e8b03c93d1a8801 63547bbb4787f2f2839b6277a288182cbf 623cb, cn=Raju Kalluji Narpande
Date: 2018.03.26 11:22:18 +05'30'

(राजू क. नरपांडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा.मंत्री (अ.ना.पु.ग्रा.सं) यांचे खाजगी सचिव.
४. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय.
५. मा.राज्यमंत्री यांचे (अ.ना.पु.ग्रा.सं) यांचे खाजगी सचिव.
६. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
८. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
९. प्रधान सचिव (अ.ना.पु.व ग्रा.सं.)यांचे स्वीय सहाय्यक.

१०.मा.सरकारी वकील (अपील शाखा), यांचे कार्यालय, उच्च न्यायालय, मुंबई.
११.महालेखापाल (ले. व अ.), महाराष्ट्र-१ व २ , नागपूर/मुंबई.
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ व २, नागपूर/मुंबई.
१३.वित्तीय सल्लागार व उपसचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं. कार्यालय, मुंबई.
१४.प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
१५.प्रबंधक, परिक्रमा खंडपीठ, औरंगाबाद व नागपूर.
१६.सर्व प्रबंधक, जिल्हा मंच.
१७.अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१८. सर्व संबंधित जिल्हा कोषागारे कार्यालय.
१९. कक्ष अधिकारी(व्यय-१०), वित्त विभाग.
२०. कक्ष अधिकारी (कोषा-प्रशा-५), वित्त विभाग.
२१. निवडनस्ती-ग्रा.सं.४.